19 FEB 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेदनेच्या हुंकारातून फुलला सृजनाचा अंकुर


## शिवाजी विद्यापीठात डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेचे उद्घाटन

कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा

वेदनेच्या हुंकारावर दातृत्वाच्या फुंकरीने सृजनाचा अंकुर फुलल्याचे दृश्य मंगळवारी शिवाजी विद्यापीठात 'डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिके'च्या उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने उपस्थितांना अनुभवता आले अन् नकळत अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. लाडक्या लेकीच्या आठवणींचे दुःखाश्रू एका डोळ्यात व तिच्या स्मृती चिरंजीव करणारी अभ्यासिका इमारत साकारल्याचे आनंदाश्रू दुसऱ्या डोळ्यात, अशी आई-वडिलांची अवस्था पाहून सारे हेलावून गेले.

विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. रामचंद्र पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी त्यांची कन्या डॉ. (अॅड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठास दोन टप्प्यांमध्ये ६० लाख निधी दिला. त्यामधून 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थिनींच्या वसतिगृह परिसरात उभारलेल्या इमारतीचे उद्घाटन हेमकिरण पणदूरकर यांच्या हस्ते कोनशिला अनावरण व फीत कापून झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. पणदूरकर यांनी मुलीच्या आठवणींना उजाळा दिला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले,

वसतिगृह अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपक भादले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेचे कोनशिला अनावरणाने उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. रामचंद्र पणदूरकर, हेमकिरण पणदूरकर आदी. (छाया : मिलन मकानदार)

### एका वर्षात दुमजली अभ्यासिका साकार

डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिका इमारतीमध्ये तळमजला व पहिला मजला असे ३८५० चौरस फुटांचे दुमजली बांधकाम केले आहे. या ठिकाणी ३०० विद्यार्थिनींची अभ्यासाची सोय झाली आहे. गेल्यावर्षी १३ फेब्रुवारी रोजी इमारतीचे भूमिपूजन झाले होते.

19 FEB 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला विद्यापीठ शिवमय

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पोवाड्याचे सूर घुमताच आसमंतात स्फूर्तिदायी तरंग उमटले. युवा शाहीर अमोल रणदिवे यांनी सादर केलेल्या पोवाड्यातून शिवरायांची शौर्यगाथा डोळ्यासमोर उभी राहिली. मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले.

शिवचरित्र अभ्यासक राहुल नलावडे यांनी 'कणखर नेतृत्वासाठी शिवनीती' या विषयावर संवाद साधला. महाराष्ट्र संस्कृती शिवराज्याभिषेक सोहळा रंगला. विविध कार्यक्रमांनी शिवमय झालेल्या विद्यापीठात आज शिवजयंतीदिनीही कार्यक्रमांची रेलचेल सुरू राहणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व संशोधक विद्यार्थी यांच्या वतीने राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ या कार्यक्रमाला मंगळवारी सुरुवात झाली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

नलावडे म्हणाले, नेतृत्वगुणाला अधिक कणखर करणारे 'शिवनीती'तील हे सार प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे. महाराज जेवढे समर्थ सेनानी होते, तेवढेच तत्पर प्रशासक होते. दुर्गकारण, अर्थकारण, समाजकारण, आरमार या सर्वांवरील कार्यकर्तृत्वाने मोठी छाप त्यांनी पाडली. महाराजांची युद्धकाळामध्ये गडांवरील व्यवस्थापनावर पकड होती.

शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यापीठात आज बुधवारी सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल. त्यानंतर मर्दानी खेळ तसेच पारंपरिक ढोल, ताशा, लेझीम आदींचे सादरीकरण होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर सुमित्रा कुलकर्णी यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन होईल. सायंकाळी दीपोत्सवाचेही आयोजन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 FEB 2025
पुण्यनगरी

# सर्वश्रेष्ठ ज्ञाननिर्मितीमध्ये युवा पिढीचे योगदान महत्त्वाचे

**डॉ. माणिकराव साळुंखे** | **शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे उद्घाटन**

▮ कोल्हापूर : प्रतिनिधी

विविधतेमध्ये एकात्मता हे भारताचे वैशिष्ट्य म्हणून पाहिले जाते. या विविधतेतून सर्वश्रेष्ठ ज्ञानाची निर्मिती व्हावी, यासाठी युवा पिढीचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता साप्ताहिक शिबिरास प्रारंभ झाला. यात महाराष्ट्रासह १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय व शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी देशातील सर्व सामाजिक-आर्थिक घटकांचा विकास होणे आवश्यक आहे. राजर्षी शाहू महाराजांनी अशा सामाजिक-आर्थिक विकासासाठी पावले उचलली. त्या कार्याच्या पाऊलखुणा आजही या भूमीवर पाहावयास मिळतात. देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी दसरा चौकामधील वसतिगृहांच्या रूपाने राजर्षी शाहू महाराजांची सजीव स्मारके आवर्जून पाहावीत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या निमित्ताने देशभरातून आलेल्या तरुणांनी एकमेकांशी संवाद साधावा, एकमेकांच्या भाषा, संस्कृती जाणून त्यांचा आदर करण्याची भावना विकसित करावी. महाराष्ट्र एनएसएसचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही मते व्यक्त केली. डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम अधिकारी प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमाजी पाटील यांनी आभार मानले.

### पारंपरिक वेशभूषा संचलनाने प्रारंभ

विद्यापीठात २२ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गोवा या राज्यांतील २१ विद्यापीठांचे २१० स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. ते आपापल्या राज्याच्या पारंपरिक वेशभूषेसह विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर एकत्रित आले.

19 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'इन्फोसिस'साठी ९४२ विद्यार्थिनींची चाचणी

- विद्यार्थिनींसाठीचा विद्यापीठातील पहिलाच मोठा कॅम्पस्



इन्फोसिसच्या कॅम्पस ड्राईव्हसाठी शिवाजी विद्यापीठात मोठ्या संख्येने उपस्थित विद्यार्थिनी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात इन्फोसिस कंपनीच्या वतीने आयोजित कॅम्पस पूल ड्राइव्हअंतर्गत ९४२ विद्यार्थिनींच्या ऑनलाईन चाचणीचा टप्पा यशस्वीरित्या पार पडला. यात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या निवडक विद्यार्थिनींची आज (दि. १९) मुलाखत घेऊन अंतिम निवड करण्यात येणार आहे. इन्फोसिसच्या कॅम्पस निवडीमध्ये विद्यार्थिनींना शंभर टक्के स्थान दिले आहे.

इन्फोसिस पूल कॅम्पस ड्राइव्हसाठी सुमारे २२०० विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. त्यामधील १ हजार ३०४ विद्यार्थिनींची ऑनलाईन चाचणीसाठी निवड झाली. त्यातील ९४२ जणींनी ऑनलाईन चाचणी दिली. यामध्ये अभियांत्रिकी पदवीधरांसह गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विषयांत एम. एस्सी. आणि एमसीए झालेल्या विद्यार्थिनींचा समावेश राहिला. दोन बॅचेसमध्ये या विद्यार्थिनींची ऑनलाईन चाचणी घेतली जाणार आहे. तंत्रज्ञान अधिविभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि आय.जी.टी.आर. कक्ष (भूगोल अधिविभाग) येथे चाचणी झाली. चाचणी परीक्षेपूर्वी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात इन्फोसिसच्या सिनिअर असोसिएट लीड (टीम ॲक्विझिशन) मेधा बहुखंडी यांनी उपस्थित विद्यार्थिनींशी संवाद साधत इन्फोसिस कंपनीविषयी माहिती दिली.

निवड झालेल्या उमेदवारांना इन्फोसिसच्या मैसूर येथील जगातील सर्वात मोठ्या कॉर्पोरेट प्रशिक्षण केंद्रामध्ये सहा महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. विद्यार्थिनींच्या विविध शंकांचेही त्यांनी समाधान केले. संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीम कार्यरत होती. त्याचप्रमाणे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहापासून विद्यार्थिनींना तंत्रज्ञान अधिविभागातील चाचणी केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी विशेष आरामबसेसची सुविधाही पुरविण्यात आली. विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. शामल पवार यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी इन्फोसिसचे सुमीत गोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. गणेश पाटील, डॉ. रामचंद्र जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025

सकाळ

# 'इन्फोसिस'तर्फे विद्यापीठात कॅम्पस ड्राइव्ह

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठात इन्फोसिस कंपनीतर्फे आयोजित कॅम्पस पूल ड्राइव्हअंतर्गत ९४२ विद्यार्थिनींच्या ऑनलाईन चाचणीचा टप्पा आज यशस्वीरित्या पार पडला. यात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या निवडक विद्यार्थिनींची उद्या (ता. १९) मुलाखत घेऊन अंतिम निवड करण्यात येणार आहे.

कॅम्पस ड्राइव्हसाठी सुमारे २२०० विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. त्यामधील १३०४ विद्यार्थिनींची ऑनलाईन चाचणीसाठी निवड करण्यात आली होती. त्यातील ९४२ जणींनी आज ऑनलाईन चाचणी दिली. तंत्रज्ञान अधिविभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि आय.जी.टी.आर. कक्ष (भूगोल अधिविभाग) येथे चाचणी झाली. यावेळी इन्फोसिसचे सुमीत गोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. गणेश पाटील, डॉ. रामचंद्र जाधव यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्रशिक्षण अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर यांनी संयोजन केले.

19 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहास विभागांतर्गत अध्यासन दुर्मीळ संदर्भ ग्रंथांचे भांडार

## पावणेतीन हजार दुर्मीळ ग्रंथांसह २ लाखांहून अधिक मोडीलिपी कागदपत्रांचा ठेवा

## देशभरातील एकमेव मराठा इतिहास संशोधन केंद्र

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागांतर्गत छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र सुरू आहे. या केंद्रांमध्ये पावणेतीन हजार दुर्मीळ ऐतिहासिक संदर्भग्रंथ तर जवळजवळ २ लाख मोडी लिपी कागदपत्रे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या कालखंडातील मराठ्यांचा इतिहाससंदर्भातील कागदपत्रे या केंद्रात आहेत. या कागदपत्रांसह संदर्भग्रंथांचा अभ्यास अनेक संशोधक करीत आहेत. म्हणूनच संदर्भाचे भांडार म्हणजे इतिहास विभागातील संशोधन केंद्र, अशी ओळख देशभर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या केंद्रांचा घेतलेला आढावा.



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली मराठा सत्ता अठराव्या शतकात गुजरात, राजस्थान, माळवा, बुंदेलखंड, ओरिसा आणि कर्नाटकात पसरली. त्या प्रदेशांमध्ये उपलब्ध असलेली ऐतिहासिक कागदपत्र व इतर साधनांमध्ये मराठा इतिहासाचे बरेच संदर्भ उपलब्ध आहेत. इतिहास विभागातील केंद्रांमध्ये मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषा आणि संस्कृती तसेच दक्षिणी संस्थानांच्या इतिहासाच्या नोंदी असलेले ग्रंथ व कागदपत्रे आहेत. त्यामुळे मराठा इतिहास आणि मराठी भाषा व संस्कृती, दक्षिणी संस्थानांचा इतिहास शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाचे एक प्रमुख केंद्र आहे.

या केंद्रांतर्गत ऐतिहासिक घटनांवर संशोधन करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. याशिवाय मराठा इतिहासावर अनेक कार्यशाळेच्या माध्यमांतून छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य तरुणांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जातोय. मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित विषयांवर अनेक पीएच.डी. आणि एम.फिल.चे शोधप्रबंध पूर्ण झालेले आहेत. या केंद्राच्या माध्यमातून मराठा इतिहासाच्या विविध महत्वाच्या पैलूंचा उलगडा करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे.

विद्यापीठातील इतिहास विभागांतर्गत केंद्रामध्ये मराठा इतिहास कोश खंडामधील मराठा इतिहास विषयक नोंदीचे काम सुरु आहे. त्यामध्ये आवश्यक त्या बदलासह अद्ययावत नोंदी अभ्यासकांना ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. छत्रपती संभाजी महाराज यांच्या (तारीखवार, घटनां)च्या नोंदी करून संदर्भग्रंथ तयार केला जाणार आहेत. तसेच काही लघु संशोधन प्रकल्प पूर्ण करण्याचे कामही सुरु आहे. मराठा इतिहासातील संशोधनाचे विविध पैलू नवीन पिढीपर्यंत पोहचवण्याचा दोन्ही अध्यासनाचा मानस आहे. त्यामुळे ज्यांना मराठ्यांचा इतिहास या विषयावर संशोधन करायचे आहे, त्यांनी येथील कागदपत्रांसह ग्रंथांचा अभ्यास करावा, असे आवाहनही संशोधन केंद्राच्या वतीने सातत्याने केले जात आहे.

### संशोधनाचा दर्जा वाढला

संशोधन व शिक्षणावर विद्यापीठाचा दर्जा ठरत असतो. हा दर्जा वाढवण्यासाठी छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राचे महत्वाचे योगदान आहे. विज्ञान शाखेप्रमाणे छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राचे दर्जात्मक संशोधन भारतभर पोहचले आहे. मोडी लिपितील कागदपत्रांचा संशोधनामध्ये संदर्भ म्हणून वापर केला जात आहे. शिवाजी विद्यापीठाच्या यशात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र महत्वाचे स्थान आहे.



### मराठा इतिहासाच्या संशोधनाला चालना

शिवाजी विद्यापीठात मराठ्यांचा इतिहास, मराठी भाषा आणि संस्कृती तसेच दक्षिणी संस्थानाच्या इतिहासाच्या संशोधनला चालना दिली जाते. विद्यापीठातील इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, व छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्रामार्फत मराठा इतिहासाच्या अनेक पैलूवर नवीन प्रकाश टाकणारे संशोधन प्रकाशने प्रसिध्द केली आहेत. हे कार्य अविरतपणे सुरु आहे.

– डॉ. अवनीश पाटील (विभागप्रमुख, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025
तरुण भारत



कोल्हापूर : आरडीसी, एडीपी व महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या छात्रांसोबत प्र– कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ॲड. के. ए. कापसे, डॉ. उषा पाटील, कॅप्टन उमेश वांगदरे, कॅप्टन डॉ. सुजाता पाटील आदी.

# एनसीसीतून परिश्रमाची शिकवण

■ प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

त्याग, समर्पण, जिद्द आणि पराकोटीचे परिश्रम घेण्याची शिकवण एनसीसी मध्ये दिली जाते. त्यामुळे छात्रांच्या मनामधे राष्ट्रसेवेची बीजे रुजली जातात, असे प्रतीपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र– कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महावीर महाविद्यालयात आयोजित प्रजासत्ताक दिन परेड, आर्मी डे परेड व महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या छात्रांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. के. ए. कापसे होते. संस्थेचे सचिव मोहन गरगटे व सुभेदार मेजर शिवा बालक यांची उपस्थिती होती.

डॉ. पाटील म्हणाले, एनसीसी ही युवा संघटना आहे. युवकांमध्ये देशप्रेम व समाजसेवेसाठी कायम तत्पर राहण्याची भावना जागृत ठेवते. एनसीसीचे शैक्षणिक जीवनात खूपच महत्व आहे. डॉ. उषा पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिरीष शितोळे यांनी आभार मानले. कॅप्टन उमेश वांगदारे व कॅप्टन डॉ. सुजाता पाटील यांनी संयोजन केले. प्रा. संध्या जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025

पुढारी

# विद्यापीठात आज छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्राच्या वतीने ग्रंथ प्रकाशन सोहळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या वतीने बुधवार (दि.१९) रोजी ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी लिखित 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ७१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ७१० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी एमबीए व एमए (इंग्लिश) आदी सात अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर झाला, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025

तरुण भारत

# विद्यापीठांतर्गत ७१० परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२४ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ७१० परीक्षांचे निकाल जाहीर झाले. एमबीए, एम. ए. इंग्रजी अभ्यासक्रमाच्या मंगळवारी परीक्षा झाल्या. या परीक्षांवर नियंत्रन ठेवण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली. विद्यार्थ्यांनी परीक्षेत कॉपी करू नये, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2025
पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघाची निवड

**मुरगूड :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आयोजित २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा चंद्रपूर येथील शिवाजी महाराज विद्यापीठात होत आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या १२ खेळाडूंची निवड झाली असल्याची माहिती निवड समिती चेअरमन प्रा. सुनील चव्हाण यांनी दिली. या संघात ओंकार लोकरे, गजानन गोधडे, कृपेश पाटील, अमन नायकवडी, हर्षद कांदळकर, अभिजित कांबळे, गिरीश खामकर, धीरज पाटील, धैर्यशील खोत, पीयूष जांभळे, देवेंद्र कोळगे, सौरभ गदाळे यांचा समावेश आहे. निवड समितीचे चेअरमन प्रा. सुनील चव्हाण (कुरुंदवाड), प्रा. संदीप पाटील (इस्लामपूर) व प्रा. एन. डी. पाटील (बिद्री) यांच्या समितीने निवड केली आहे.